दिनांक : २२/०९/२०२०

# <u>अहवाल</u>

## " 133 वी कर्मवीर जयंती सोहळा 2020 - 21 "

रयत शिक्षण संस्थेचे आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, स्वा. रा. विद्यालय व सौ ल.भा.पाटील कन्या विद्यालय रामानंदनगर ( बुर्ली )यांचे संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची 133 वी जयंती सोहळा मंगळवार दिनांक 22 सप्टेंबर 2020 रोजी सकाळी 11:30 वाजता ऑनलाइन संपन्न झाला .

कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर प्रतिमा पूजनाने झाली. प्रतिमा पूजनावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. महेंद्र (आप्पा ) लाड कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असलेले श्री जे.के.(बापू) जाधव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल डी. कदम स्वा.रा. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री डी.एम. जाधव व ल. भा. पाटील कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. एल. एस. पाटील इ. मान्यवर उपस्थित होते.

रयतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम साहेब यांनी उपस्थितांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

त्यानंतर कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष श्री. प्रा. पाटील डी.एस. यांनी रयत संकुलातील तिन्ही शाखांचे अहवाल वाचन केले. त्यानंतर स्वा .रा. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जाधव डी. एम. यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्रा. श्री सतीश शिर्के ( राधाबाई काळे महिला महाविद्यालय अहमदनगर ) यांनी मनोगत व्यक्त केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी त्यांच्या आयुष्यातील महत्वाच्या घडामोडी आणि आपण अण्णांचा वारसा कसा जतन केला पाहिजे याबाबत त्यांनी मोलाचे मार्गदर्शन आपल्या भाषणातून केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती असलेले माननीय श्री. जे. के.( बापू )जाधव यांनी देखील आपल्या मनोगतातून मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. महेंद्र (आप्पा) लाड (सदस्य महाविद्यालय विकास समिती) यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि त्यांनी केलेला त्याग व कष्ट याचा उल्लेख आपल्या भाषणातून केला. कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एस. पाटील यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.शिंदे एस.के. मॅडम यांनी केले.

शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. अशा रीतीने ऑनलाइन पद्धतीने 133 वी कर्मवीर जयंती सोहळा संपन्न झाला .

6/2020 IMG 20200925-WA0015.jpg




आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज